# 15. सांख्यिकी

## सरावसंच 54

**1.** एका शहरामध्ये एका आठवड्यात पडलेला पाऊस मिमीमध्ये दिला आहे. त्यावरुन आठवड्याची पावसाची सरासरी काढा :

9, 11, 8, 20, 10, 16, 12.

उकल :

$$\text{सरासरी} = \frac{\text{दिलेल्या माहितीतील सर्व प्राप्तांकांची बेरीज}}{\text{एकूण प्राप्तांकांची संख्या}}$$

$$= \frac{9 + 11 + 8 + 20 + 10 + 16 + 12}{7}$$

$$= \frac{86}{7}$$

$$= 12.2857 \approx 12.29$$

$\therefore$ आठवड्याच्या पावसाची सरासरी 12.29 मिमी आहे.

**2.** शाळेच्या स्नेहसंमेलनामध्ये स्वयंसिद्धा महिला बचत गटाने आपला खाद्यपदार्थांचा स्टॉल लावला होता. दर तासाला झालेली विक्री ₹ 960, ₹ 830, ₹ 945, ₹ 800, ₹ 847, ₹ 970 याप्रमाणे आहे. तर ताशी सरासरी किती रुपयांची विक्री झाली ?

उकल :

$$\text{सरासरी} = \frac{\text{दिलेल्या माहितीतील सर्व प्राप्तांकांची बेरीज}}{\text{एकूण प्राप्तांकांची संख्या}}$$

$$= \frac{960 + 830 + 945 + 800 + 847 + 970}{6}$$

$$= \frac{5352}{6}$$

$$= 892$$

∴ ताशी सरासरी विक्री ₹ 892 झाली.

3. विदर्भात 5 वर्षांत पडलेल्या पावसाची नोंद खाली दाखवली आहे. त्यावरुन पावसाची 5 वर्षांतील सरासरी काढा :

900 मीमी, 650 मीमी, 450 मीमी, 733 मीमी, 400 मीमी,

उकल :

$$\text{सरासरी} = \frac{\text{दिलेल्या माहितीतील सर्व प्राप्तांकांची बेरीज}}{\text{एकूण प्राप्तांकांची संख्या}}$$

$$= \frac{900 + 650 + 450 + 733 + 400}{5}$$

$$= \frac{3133}{5} = 626.6$$

∴ 5 वर्षात पडलेल्या पाऊसाची सरासरी $626.6$ मिमी आहे.

4.एका शेतकऱ्याने पशुखाद्याची पोती आणली. त्यांची वजने किग्रॅमध्ये पुढे दिली आहेत. तर पोत्यांचे सरासरी वजन काढा.

49.8, 49.7, 49.5, 49.3, 50, 48.9, 49.2, 48.8

उकल :

सरासरी = दिलेल्या माहितीतील सर्व प्राप्तांकांची बेरीज / एकूण प्राप्तांकांची संख्या

$$= \frac{49.8 + 49.7 + 49.5 + 49.3 + 50 + 48.9 + 49.2 + 48.8}{8}$$

$$= \frac{395.2}{8}$$

$$= 49.4$$

∴ पोत्यांचे सरासरी वजन $49.4$ किग्रॅ आहे.

## सरावसंच 55

**1.** एका वर्गातील 30 मुलांची उंची (सेमी) मध्ये दिली आहे. त्यावरुन वारंवारता सारणी तयार करा :

131, 135, 140, 138, 132, 133, 135, 133, 134, 135, 132, 133, 140, 139, 132, 131, 134, 133, 140, 140, 139, 136, 137, 136, 139, 137, 133, 134, 131, 140.

**उकल :**

| उंची (सेमीमध्ये) | ताळयाच्या खूणा | वारंवारता |
|---|---|---|
| 131 | \|\|\| | 3 |
| 132 | \|\|\| | 3 |
| 133 | ~~\|\|\|\|~~ | 5 |
| 134 | \|\|\| | 3 |
| 135 | \|\|\| | 3 |
| 136 | \|\| | 2 |
| 137 | \|\| | 2 |
| 138 | \| | 1 |
| 139 | \|\|\| | 3 |
| 140 | ~~\|\|\|\|~~ | 5 |
| | एकूण वारंवारता | N = 30 |

**2.** एका वसाहतीमध्ये 50 कुटुंबे राहतात. प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींची संख्या पुढे दिली आहे. त्यावरुन वारंवारता सारणी तयार करा :

5, 4, 5, 4, 5, 3, 3, 3, 4, 3, 4, 2, 3, 4, 2, 2, 2, 2, 4, 5,1, 3, 2, 4, 5, 3, 3, 2, 4, 4, 2, 3, 4, 3, 4, 2, 3, 4, 5, 3, 2, 3, 2, 3, 4, 5, 3, 2, 3, 2.

**उकल :**

| कुटूंबातील व्यक्तींची संख्या | ताळयाच्या खूणा | वारंवारता |
|---|---|---|
| 1 | \| | 1 |
| 2 | ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ \|\|\| | 13 |
| 3 | ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ \| | 16 |
| 4 | ~~\|\|\|\|~~ ~~\|\|\|\|~~ \|\|\| | 13 |
| 5 | ~~\|\|\|\|~~ \|\| | 7 |
| | एकूण वारंवारता | N = 50 |

**3. एक फासा 40 वेळा फेकला तर वरच्या पृष्ठभागावर मिळालेल्या संख्यांची नोंद केली. त्यावरुन वारंवारता सारणी तयार करा.**

**3, 2, 5, 6, 4, 2, 3, 1, 6, 6, 2, 3, 5, 3, 5, 3, 4, 2, 4, 5, 4, 2, 6, 3, 3, 2, 4, 3, 3, 4, 1, 4, 3, 3, 2, 2, 5, 3, 3, 4.**

**उकल :**

| वरच्या पृष्ठभागावर मिळालेल्या संख्यां | ताळयाच्या खूणा | वारंवारता |
|---|---|---|
| 1 | 𝍷𝍷 | 2 |
| 2 | 𝍸 𝍷𝍷𝍷 | 8 |
| 3 | 𝍸 𝍸 𝍷𝍷𝍷 | 13 |
| 4 | 𝍸 𝍷𝍷𝍷 | 8 |
| 5 | 𝍸 | 5 |
| 6 | 𝍷𝍷𝍷𝍷 | 4 |
| | एकूण वारंवारता N = 40 | |

**4.** एका वसतिगृहाच्या खानावळीमध्ये 30 मुलांना जेवणामध्ये खालीलप्रमाणे पोळ्यांची संख्या लागते. त्यावरुन वारंवारता सारणी तयार करा :

3, 2, 2, 3, 4, 5, 4, 3, 4, 5, 2, 3, 4, 3, 2, 5, 4, 4, 4, 3, 3, 2, 2, 2, 3, 4, 3, 2, 3, 2.

**उकल :**

| पोळ्यांची संख्या | ताळयाच्या खूणा | वारंवारता |
|---|---|---|
| 2 | 𝍸 \|\|\|\| | 9 |
| 3 | 𝍸 𝍸 | 10 |
| 4 | 𝍸 \|\|\| | 8 |
| 5 | \|\|\| | 3 |
| | एकूण वारंवारता N = 30 | |

*****